कोकणसाद
www.kokansad.com

शनिवार, दि. १५ ऑक्टोबर २०२२

# हळबे महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

कोकणसाद वृत्तसेवा

**दोडामार्ग:** येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात घेण्यात आलेल्या ए. डी. श्रॉफ वक्तृत्व स्पर्धेला उत्स्फूर्त सहभाग लाभला. या स्पर्धेत महिमा गवस प्रथम, साक्षी गवस द्वितीय, तर सोनल गवसने तृतीय क्रमांक पटकावले.

फोरम ऑफ फ्री एंटरप्राइजेस, मुंबई या संस्थेतर्फे राबविण्यात येणारी स्पर्धा गेली ५६ वर्षांपासून सातत्याने चालू असून महाविद्यालयात मागील दहा वर्षांपासून राबविण्यात येते.

दोन राऊंडमध्ये घेण्यात येणाऱ्या या स्पर्धेतील यावर्षीचे विषय 'कोविड महामारीच्या काळातील अर्थव्यवस्थेचे व्यवस्थापन.' 'भारतीय अर्थव्यवस्थेला २०२७ पर्यंत पाच ट्रिलियन डॉलर बनवणे स्वातंत्र्याची ८० वर्षे, विकसनशील अर्थव्यवस्थेमध्ये आंतरराष्ट्रीय वित्ताची भूमिका. 'वाढत्या सायबर गुन्ह्याचा धोका व उपाय' हे होते. यामध्ये प्रथम पारितोषिक २५००, द्वितीय १५००, तर तृतीय १०००रुपये असे होते.

महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाच्यावतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्य डॉ. सुभाष सावंत म्हणाले की, स्पर्धा कोणतेही असो त्याला धैर्याने सामोरे गेले पाहिजे. त्यासाठी वाचन, मनन, चिंतन केले पाहिजे तरच आपण पुढे जाऊ शकतो.

या स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा. डॉ. एस. एन. खडपकर, व प्रा. प्रीती प्रसादी यांनी काम पाहिले. सर्व स्पर्धक, प्राचार्य, उपस्थित विद्यार्थी व परीक्षकांचे आभार प्रा. डॉ. पी. डी. गाथाडे यांनी मानले.